महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

परीपत्रक : महत्वाचे

क्रमांक: १०/तंशिसं/पदविका प्रवेश/प्रमाणपत्रे सुट/२०२३/७८३ दिनांक : 11 SEP 2023

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांना लागणारी विविध प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत....

संदर्भ : या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक: १०/तंशिसं/पदविका प्रवेश/प्रमाणपत्रे सुट/२०२३/५५५, ७.७.२०२३.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता इयत्ता दहावीनंतरचे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम, बारावीनंतरचे औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, सरफेस कोटींग तंत्रज्ञान पदविका आणि बारावी/ आयटीआय नंतरचे थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या पदविका अभ्यासक्रमांच्या महाराष्ट्र राज्यातील संस्थांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी अर्ज भरतांना/ संस्थेत प्रवेश घेतांना आवश्यक त्या प्रकरणी जात/ जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला ही प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यामुळे संदर्भीय परिपत्रकान्वये, उमेदवारांना संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाच्या पावतीसह हमीपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली होती. तसेच विहीत कालावधीत उमेदवारांनी सदर मुळ कागदपत्रे सादर करण्याबाबत देखील कळविण्यात आले होते. त्यानुसार बऱ्याच उमेदवारांनी त्यांची मुळ कागदपत्र संस्थेकडे सादर केलेली आहेत.

सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेच्या तीन फेऱ्या पुर्ण झालेल्या आहेत. संस्थांनी उमेदवारांना वारंवार सुचना देऊन सूध्दा काही उमेदवारांनी उपरोक्त नुसार मुळ कागदपत्र अद्याप संबंधित संस्थेकडे सादर केलेली नाहीत, असे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. ज्या उमेवारांनी अद्याप ही कागदपत्र सादर केलेली नाहीत, अशा उमेदवारांची यादी सोबत जोडली आहे. याबाबत कळविण्यात येते की, सदर उमेदवारांना सदर मुळ कागदपत्र प्रवेशित संस्थेत सादर करण्यास दिनांक १३.९.२०२३ रोजी सांय. ५.०० वाजेपर्यंत अंतिम संधी देण्यात येत आहे. सदर मुदतीत उमेदवारांनी संस्थेस मुळ कागदपत्र सादर न केल्यास, सदर उमेदवारांचा केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे झालेला प्रवेश रद्द होईल व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच अशा प्रकारे प्रवेश रद्द झालेले विद्यार्थी संस्था स्तरावर प्रवेशास पात्र राहतील.

सोबत : मुळ प्रमाणपत्र सादर न केलेल्या उमेदवारांची यादी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.